आगच्छत् शिक्षार्थम्। निर्गच्छत् सेवार्थम्।

# महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा),औरंगाबाद

## School Leadership Academy, Maharashtra

## मोड्यूल क्र.२७

# ग्रामीण, दुर्गम, डोंगराळ व शैक्षणिकदृष्ट्या मागास गटातील (गगनबावडा, जिल्हा कोल्हापूर) मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात टिकवून ठेवण्यात शालेय नेतृत्वाची भूमिका.

# The Role of School Leadership in Keeping Girls from Rural, Remote, Hilly and Educationally Backward Groups (Gaganbawada, Dist - Kolhapur) in the Stream of Further Education.

मुली आणि महिलांसाठी शिक्षणातील प्रवेश सुनिश्चित करून त्यांची गुणवत्ता सुधारणे आणि त्यांच्या सहभागात बाधा आणणारा प्रत्येक अडथळा दूर करणे हे सर्वात निकडीचे प्राधान्य आहे. शिक्षणातील सर्व लिंग असमानता दूर केली पाहिजे.

- (World Declaration on Education for All, Article)

"मुलींच्या शिक्षणापेक्षा अधिक मौल्यवान गुंतवणूक नाही."

**-बान की मून, सरचिटणीस, (युनायटेड नेशन्स)**

मुलींना शिक्षण देणे ही सर्वात महत्त्वाची गुंतवणूक आहे. जी प्रत्येक देशाने स्वतःच्या भविष्यासाठी केली पाहिजे. अशी गुंतवणूक देशाच्या प्रगतीमध्ये योगदान देते आणि हे योगदान देताना शिक्षण ज्ञान आणि कौशल्ये प्रदान करते. विशेषत: आरोग्य, पोषण, पाणी, स्वच्छता, पर्यावरण, इ. क्षेत्रांमध्ये मुलीची क्षमता विकसित करते, तिला सक्षम करते, तिच्या जागरूक आणि चिकीत्सक विचारसरणीला चालना देते, तिला स्वत:च्या हक्कांचा दावा करण्यास सक्षम बनविते. मुलींना शिक्षित केल्याने समुदाय आणि समाज निरोगी, श्रीमंत आणि सुरक्षित बनण्यास मदत होते. तसेच बालमृत्यू कमी करण्यास, माता आरोग्य सुधारण्यासाठी आणि इतर आरोग्य समस्यांवर मात करण्यास मदत होते. मुलांप्रमाणेच मुलींना सशक्त आणि सुसज्ज करण्यात शिक्षण ही महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. म्हणूनच मुलींच्या शिक्षणावर अधिक भर देण्याची आणि शिक्षणाकडे महिलांच्या सक्षमीकरणाचे साधन म्हणून पाहण्याची नितांत गरज आहे. स्त्रिया आणि मुलींविरुद्धच्या पद्धतशीर भेदभावामुळे अनेक मुलींना शाळेत प्रवेश करण्यापासून, मूलभूत कौशल्ये शिकण्यापासून आणि प्राथमिक

शिक्षणानंतरचे शिक्षण घेण्यापासून अडथळा निर्माण होत होता. केवळ एक चांगले कुटुंबच नव्हे तर एक चांगले राष्ट्र बनविण्यासाठी महिलांचे शिक्षण ही अत्यंत आवश्यक गोष्ट आहे.

भारत सरकारने समाजातील शैक्षणिकदृष्टीने उपेक्षित असलेल्या मुलींपर्यंत पोहोचण्यासाठी प्राथमिक स्तरावरील मुलींच्या शिक्षणासाठी राष्ट्रीय कार्यक्रम (NPEGEL) आणि कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय (KGBV) हे दोन महत्वपूर्ण कार्यक्रम सुरू केले. महिला ग्रामीण साक्षरता राष्ट्रीय सरासरीपेक्षा कमी असलेल्या तसेच साक्षरतेतील लिंग आंतरराष्ट्रीय सरासरीपेक्षा जास्त असणाऱ्या देशातील 3282 पेक्षा जास्त शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या गटात उपरोक्त कार्यक्रम सुरु करण्यात आलेले आहेत.

कोल्हापूर जिल्ह्यातील गगनबावडा तालुका हा ग्रामीण,डोंगराळ ,पावसाळयातील प्रतिकूल हवामान, दुर्बल, वंचित व शैक्षणिकदृष्ट्या मागास गटात मोडतो. येथील मुलींचे शिक्षणात टिकून राहण्याचे प्रमाण अत्यल्प होते. तसेच भविष्यात शालाबाह्य होण्याचे प्रमाण अधिक आहे. ग्रामीण भागात मुलींच्या शिक्षणाविषयी खूप मोठी अनास्था आहे. अशा वातावरणात २००८ मध्ये कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयाची स्थापना या भागात झाली. विद्यालयाने गेल्या १४ वर्षात पंचक्रोशीतील मुलींना शाळेच्या मुख्य प्रवाहात आणण्यात व टिकवून ठेवण्यात महत्वपूर्ण भूमिका बजावली आहे. सदरचे मोड्यूल मुलींना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात टिकवून ठेवण्यासाठी आलेल्या समस्यांवर कशाप्रकारे मात करावी, यासाठी मार्गदर्शक आहे.

**मोड्यूल विकसित करण्याचे कारण -**

मा.जिल्हाधिकारी, कोल्हापूर महोदयांकडून कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय,गगनबावडा या शाळेच्या गुणवत्ता विकाससंदर्भातील जबाबदारी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेकडे सोपविण्यात आली होती. संस्था शाळेच्या गुणवत्ता वाढीसाठी विशेष योगदान देत आहे. वारंवार शाळा भेटी, तज्ञांचे मार्गदर्शन, मूल्यमापन, मुलींच्या व्यक्तिमत्व विकासासाठी विविध कार्यक्रम इ. उपक्रमातून संस्था शाळेच्या गुणवत्ता विकासासाठी कटिबद्ध आहे. शाळेच्या मुख्याध्यापिका व त्यांच्या सहकाऱ्यांनी शाळेच्या सर्वांगिण गुणवत्ता वाढीसाठी दिलेल्या योगदानाला संस्थेच्या माध्यमातून व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले.

**मोड्यूल अध्ययनाची उद्दिष्टे -**

1.ग्रामीण, दुर्गम, डोंगराळ व शैक्षणिकदृष्ट्या मागास गटाची संकल्पना समजून घेणे.
२.शैक्षणिकदृष्ट्या मागास गटातील मुलींचे शिक्षण व त्याची सद्यस्थिती समजून घेणे.
३.ग्रामीण, दुर्गम, डोंगराळ व शैक्षणिकदृष्ट्या मागास असलेल्या गटात मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात टिकवून ठेवण्यासाठी यशस्वी झालेल्या नेतृत्वाची गुणवैशिष्ट्ये समजून घेणे.
४. ग्रामीण, दुर्गम, डोंगराळ व शैक्षणिकदृष्ट्या मागास गटात मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात टिकवून ठेवण्यासाठी शालेय नेतृत्वाचा दृष्टिकोन विकसित करणे.

**डोंगरी क्षेत्र संकल्पना -**

डोंगर - दऱ्यांनी युक्त, वाहतूक व दळणवळणाच्या दृष्टीने दुर्गम अशा प्रदेशात, अनेक वाड्या वस्त्यांमध्ये असंख्य आदिवासी बांधव वस्ती करून राहत आहेत. डोंगर-दऱ्या, रस्ते, वीज, दळणवळण व्यवस्थेच्या अपुऱ्या सोयी यांमुळे अशा भागात पुरेशा भौतिक सुविधा बऱ्याचदा उपलब्ध होऊ शकत नाहीत. विशेषतः मुलींच्या शिक्षणाविषयी या भागात अनास्था दिसून येते. अशा दुर्गम प्रदेशातील शाळांमध्ये कार्यरत असलेले शिक्षक, मुख्याध्यापक आणि पर्यवेक्षकीय अधिकारी म्हणजे डोंगरी क्षेत्रातील शालेय नेतृत्व होय. भौतिक, आर्थिक,

सामाजिक, शैक्षणिक, राजकीयदृष्ट्या मागे असलेल्या अशा दुर्गम व समस्याग्रस्त प्रदेशात शासनामार्फत विद्यार्थ्यांना त्यांचा मुलभूत शिक्षण हक्क प्राप्त करून देण्याची जबाबदारी सोपविलेले शिक्षक व मुख्याध्यापक यांची भूमिका खूपच महत्वपूर्ण ठरते. अशा ठिकाणी शालेय नेतृत्वाचा खऱ्या अर्थाने कस लागतो. मात्र सक्षम शालेय नेतृत्व अशा प्रतिकूल परिस्थितीत देखील आपली भूमिका यथायोग्यरीत्या पार पाडू शकते.

**कोल्हापूर जिल्ह्यातील गगनबावडा तालुक्याचे डोंगरी विभागाचे क्षेत्र दर्शविणारे विवरणपत्र**

(शासन निर्णय, नियोजन विभाग क्र.डोविका -२००९/प्र.क्र.६/का.१४८३.दि.१८ जानेवारी २०१०)

| अ.क्र . | जिल्ह्याचे नाव | डोंगरी तालुक्याचे नाव | पूर्ण गट | उपगट |
|---|---|---|---|---|
| १. | कोल्हापूर | गगनबावडा | पूर्ण गट (६१) | -- |

**तक्ता क्र.1- गगनबावडा तालुका डोंगरी विभागाचे क्षेत्र दर्शविणारे विवरणपत्र**

**गगनबावडा तालुक्याची सांख्यिकी माहिती**

(संदर्भ - लोकसंख्या जनगणना २०११)

| अ.नं. | घटक | आकडेवारी |
|---|---|---|
| १. | एकूण लोकसंख्या | ३५७७२ |
| २. | पुरुष लोकसंख्या | १८४६७ |
| ३. | स्त्री लोकसंख्या | १७३०५ |
| ४. | कुटुंबे | ७२३० |
| ५. | लिंग गुणोत्तर प्रमाण | ९३७ |
| ६. | वाय वर्ष 0-६ लिंग गुणोत्तर प्रमाण | ९१२ |
| ७. | साक्षरता | ७०.०० % |
| ८. | पुरुष साक्षरता | ७०.७२ % |
| ९. | स्त्री साक्षरता | ५१.८८ % |
| १०. | अनुसूचित जातीची लोकसंख्या | ५०७० (१४.२ %) |
| ११. | अनुसूचित जमातीची लोकसंख्या | १५९ (0.४ %) |
| १२. | निरक्षर लोकसंख्या | १३७३६<br>(पुरुष - ५४०८ , महिला - ८३२८) |

**तक्ता क्र.२ - गगनबावडा तालुका लोकसंख्या विवरण**

उपरोक्त तक्त्याचे विश्लेषण करता असे लक्षात येते की, प्रामुख्याने साक्षरता, लिंग गुणोत्तर प्रमाण व निरक्षरतेचे प्रमाण यामुळे महिलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विशेष प्रयत्न करणे गरजेचे आहे, ही बाब अधोरेखित करतात. एकूणच गगनबावडा तालुका हा शैक्षणिकदृष्ट्या मागास गटात मोडतो. अशावेळी मुलींच्या शिक्षणासाठी विशेष प्रयत्न करावे लागत आहेत. समाज आणि पालक यांच्या मनामध्ये मुलींच्या शिक्षणाविषयी खूप मोठी अनास्था आहे. तसेच ग्रामीण भाग असल्याकारणाने रूढी व परंपरा यांचा खूप मोठा पगडा आहे. अशा वातावरणात शिक्षणाची गुणवत्ता टिकवून ठेवताना शालेय नेतृत्वाचा कस लागतो आहे.

**कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय -**

मुलींच्या शिक्षणाची प्राथमिकता लक्षात घेऊन केंद्र शासनाने प्राथमिक स्तरावरील मुलींच्या शिक्षणासाठी राष्ट्रीय कार्यक्रम ( NPEGEL ) या नावाने अत्यंत मूलगामी परिणाम घडवून आणण्यासाठी सक्षम असणारा कार्यक्रम सुरु केला आहे. सदर कार्यक्रमांतर्गत प्राथमिक शिक्षणापासून पूर्णपणे वंचित राहिलेल्या तसेच शाळा अर्धवट सोडून निरक्षरतेच्या दिशेने वाटचाल करणाऱ्या मुलींकरिता त्यांचे किमान इयत्ता ८वी पर्यंतचे शिक्षण पूर्ण करण्यासाठी 'कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय' ही योजना सुरुवातीच्या टप्प्यात सुरु करण्यात आली आहे. समग्र शिक्षा योजनेच्या महत्त्वाच्या उद्दिष्टांपैकी एक उद्दिष्ट म्हणजे, 'शालेय शिक्षणाच्या सर्व स्तरावर लिंगभेद व सामाजिक संवर्गातील दरी दूर करणे होय'. परिणामी मुलींचा शिक्षणातील सहभाग वाढविण्याकरिता या योजनेंतर्गत इयत्ता बारावीपर्यंत निवासी आणि शैक्षणिक सुविधा पुरविण्याकरीता सध्या अस्तित्वात असलेल्या कस्तुरबा गांधी विद्यालयाचे उच्च प्राथमिक आणि माध्यमिक स्तरावरील मुलींच्या वसतिगृहात विस्तार केला आहे.

अनुसूचित जाती, जमाती, इतर मागास वर्ग, अल्पसंख्याक समुदाय आणि आर्थिकदृष्ट्या मागास (BPL) कुटुंबातील इयत्ता ६ वी ते इयत्ता 1२ वीपर्यंत शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या मुलींना दर्जेदार शिक्षणाची हमी देऊन प्राथमिक स्तरापासून ते माध्यमिक स्तरापर्यंत आणि शक्य असेल तिथे उच्च माध्यमिक स्तरापर्यंत शिक्षणाचे सुलभ संक्रमण होण्याची हमी ही योजना देते.

सध्या अस्तित्वात असलेल्या उच्च प्राथमिक स्तरावरील कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयाचे इयत्ता बारावीपर्यंतचे उच्चीकरण करण्याची समग्र शिक्षा योजनेत तरतूद आहे. इतर कोणत्याही योजनेअंतर्गत निवासी शाळा उपलब्ध नसल्याने व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या तालुक्यात इयत्ता सहावी ते बारावीपर्यंतच्या मुलींकरिता किमान एका निवासी शाळेची सुविधा या योजनेअंतर्गत पुरविली जाते. या योजनेतील लक्ष्य गट म्हणजे अनुसूचित जाती, जमाती, इतर मागास वर्ग, अल्पसंख्यांक समुदाय, इतर आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय कुटुंबातील इयत्ता सहावी ते बारावीपर्यंतचे शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या 10 ते 18 वर्ष वयोगटातील मुली होय.

**ग्रामीण दुर्गम डोंगराळ व शैक्षणिकदृष्ट्या मागास गटातील मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात टिकवून ठेवण्यात शालेय नेतृत्वासमोरील आव्हाने**

**विद्यार्थ्यांच्या बाबतीत आव्हाने :**

1. बहुतेक विद्यार्थिनी या गरीब कुटुंबातील व दुर्गम डोंगराळ भागातील असल्यामुळे त्यांना बाहेरील जगातील अद्ययावत गोष्टींचे ज्ञान नसते.
2. मुली भावनाप्रधान असतात. थोडी जरी घरात काही अडचण आली तर शाळेत येत नाहीत मग कितीही दिवस शाळा चुकली तरी त्यांना त्याचेही काही वाटत नाही.
3. बहुतेक विद्यार्थिनींच्या पालकांची आर्थिक स्थिती चांगली नसल्यामुळे त्यांच्याकडे शैक्षणिक साहित्याचा बरेचदा अभाव असतो.
4. दुर्गम भागातील विद्यार्थिनी असल्यामुळे त्यांच्यावर धार्मिक रूढी, परंपरा यांसारख्या गोष्टींचा फार मोठा पगडा असतो. त्यामुळे एखादा सण, उत्सव असेल तर त्यांची जास्त ओढ असते त्यामुळे अश्यावेळी गावाकडे जाण्याचे प्रमाणही वाढलेले दिसून येते.

**पालकांशी संबंधित आव्हाने :**

1. सदरची शाळा ही डोंगराळ, दुर्गम व ग्रामीण भागात येते. जिल्ह्यातून व तालुक्यातून वाहतुकीच्या सोयीची वारंवारीता कमी असल्यामुळे मुलींना घराबाहेर पाठवण्यासाठी पालक तयार नसतात.
2. 'मुलगी शिकून काय करणार ते तर परक्याचे धन आहे, त्यापेक्षा मुलाला शिकवले पाहिजे' अशी पालकांची भूमिका असते. मुलगा हा वंशाचा दिवा असतो, असे ग्रामीण भागातील पालकांची समजूत असते.
3. पालकांचा शाळेकडे सरकारी शाळा म्हणून बघण्याचा दृष्टिकोन असतो. त्यामुळे शाळेतील शिस्त, नियम तसेच शैक्षणिक बाबींसाठी शाळेला सहकार्य करण्यासंदर्भात गांभीर्याने घेतले जात नाही.
4. ग्रामीण भागात वरील समस्यांसोबतच रुढी-परंपरांचा प्रचंड मोठा पगडा असतो. शैक्षणिक नेतृत्वाला यासंदर्भात जाणीव जागृती निर्माण करण्यातसुद्धा आव्हान निर्माण होते.
5. पालक मुलींच्या भविष्याविषयी अनभिज्ञ असतात. मुलीला शिक्षण दिल्यामुळे तिचे भविष्य बदलून ती स्वतःच्या पायावर उभी राहू शकते, ही जाणीव करून द्यावी लागते.

**शिक्षकांसंबंधी आव्हाने** :

1. विद्यार्थिनी दुर्गम भागातील असल्यामुळे शालाबाह्य अथवा अन्य काही कौटुंबिक कारणामुळे पायाभूत कौशल्ये प्राप्त नसतील तर पुन्हा तिला शिक्षण प्रवाहात आणण्यासाठी बरेच कष्ट घ्यावे लागतात.
2. विद्यार्थिनींच्या मनावर रुढी-परंपरांचा पगडा असतो. त्यामुळे त्या थोड्या लाजऱ्या असतात. पुढे येऊन बोलण्याचे धाडस नसते. अशा विद्यार्थिनींना हाताळताना शिक्षकांना तारेवरची कसरत करावी लागते.
3. विद्यार्थिनी एकदा गावी गेल्या की लवकर येत नाही,त्यामुळे त्यांची अनुपस्थिती हेही आव्हान आहे.
4. सदर विद्यार्थीनी निवासी असल्यामुळे त्यांच्या शिक्षणासोबत आरोग्य, भौतिक सुविधा व इतर गोष्टींमध्येसुद्धा लक्ष द्यावे लागते.
5. शाळेत विद्यार्थिनी आली की तिची मातृभाषा व शाळेतील भाषा यांच्याशी समायोजन करताना अडचणी येतात. अशावेळी शिक्षकांना कसरत करावी लागते.

**सामाजिक आव्हाने :**

1. सरकारी शाळांकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहण्यासाठी पालकांमधील पूर्वग्रह काढून आपल्या शाळेविषयी आत्मविश्वास निर्माण करणे, हे देखील आव्हानात्मक असते.
2. या शाळेतील मुली सर्वसामान्य/निम्न मध्यम वर्ग/कनिष्ठ वर्ग यातून येत असतात. त्यामुळे त्यांच्या मनावरील सामाजिक रुढीचा पगडा हे एक आव्हान आहे.
3. ग्रामीण भागातील काही लोक कामानिमित्त स्थलांतरीत होतात. अशा परिस्थितीत मुलींना इकडे तिकडे नेणे पालकांना अवघड जाते. मुलगी बाहेर शिकायला पाठविली, शिकून काय करणार अशीही मानसिकता अनेकवेळा काही कुटुंबामध्ये दिसून येतात.

**यशोगाथा**

**कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय,गगनबावडा.**

**तालुका - गगनबावडा , जिल्हा - कोल्हापूर**

**श्रीम.गीता भावकू पाटील**

- शाळेच्या माहितीची व्हिडीओची लिंक - https://youtu.be/ljpbrcklsgU
- मुख्याध्यापक व कार्या.सहकारी मनोगत व्हिडीओची लिंक - https://youtu.be/०५४jm१२९८H४
- विद्यार्थी व पालक मनोगत व्हिडीओची लिंक - https://youtu.be/VGkVw9Lr7PQ

"अंजली सुरेश पाटील (२०२२) इयत्ता दहावी या मुलीने अनुक्रमे स्वरचित २०० कविता आणि 15 कथा लिहिलेल्या आहेत. दिव्या रामचंद्र संकपाळ (२०२२) इयत्ता दहावी या मुलीने धावणे या वैयक्तिक खेळ प्रकारामध्ये राष्ट्रीय स्तरावर प्रथम क्रमांक व कुस्ती या खेळामध्ये राष्ट्रीय स्तरावर तृतीय क्रमांक पटकावला आहे. पूजा युवराज पाटील (२००८/०९) विद्यार्थिनी सध्या सिद्धगिरी हॉस्पिटलमध्ये कार्यरत आहे. मेघा बारटक्के हिने मेकॅनिकलमध्ये डिप्लोमा पूर्ण केला आहे. जनाबाई कोळपाटे (2012/13) ही विद्यार्थिनी खाजगी हॉस्पिटलमध्ये नर्स म्हणून काम करत आहे. सुरेखा जायगुने (२०१४/१५) हिने कॉमर्स विषयातून पदवी घेतली व ती सी.ए. कडे काम करते आहे. भाग्यश्री अशोक शिवनगेकर (२०१६/१७) स्वतःच्या गावात ब्युटी पार्लरचा व्यवसाय करते आहे. नंदिनी सुतार (2014/15) या विद्यार्थिनीने राज्य स्तरावरील इन्स्पायर अवॉर्डमध्ये यश मिळविले आहे. अक्षता खाशाबा तेले (२०११/१२) हिने सिविल इंजिनीरिंगमध्ये डिप्लोमा पूर्ण केला आहे. अशी विविध नावे सांगता येतील. आज या सर्व मुली स्वतःच्या पायावर उभ्या आहेत व आपल्या कुटुंबाचा आधार बनल्या आहेत."

श्रीम.गीता पाटील मुख्याध्यापिका कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय, गगनबावडा जिल्हा कोल्हापूर या अभिमानाने आपल्या आजी - माजी विद्यार्थिनींविषयी बोलत होत्या. शैक्षणिक वर्ष २००८ पासून ते आजतागायत ग्रामीण भागातील मुलींना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी अविरतपणे आपल्या सहकाऱ्यांसोबत त्या झटत आहेत.



**कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय,गगनबावडा - इमारत**

गरजू, वंचित, दुर्बल, दारिद्रय रेषेखालील, एकल पालकत्व व शैक्षणिकदृष्ट्या मागास गटातील मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात टिकवून ठेवण्यात महत्वाची भूमिका पार पडणारी संस्था म्हणजे 'कस्तुरबा गांधी बालिका

विद्यालय, गगनबावडा'. श्रीम. गीता पाटील व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात टिकवून ठेवण्यासाठी केलेल्या नानाविध प्रयत्नातून साध्य केलेले हे यश आपल्याला दिसत आहे. गगनबावडा तालुका हा अतिशय दुर्गम, डोंगराळ व ग्रामीण भागातील तालुका आहे. महाराष्ट्रातील पर्जन्यमानानुसार व कालावधीनुसार सर्वात जास्त दिवस पाऊस या तालुक्यात पडतो. येथील भौगोलिक परिस्थितीही अतिशय प्रतिकूल आहे. वाहतुकीच्या दृष्टिकोनातून कोल्हापूर जिल्हयापासून जवळपास ५५ किलोमीटर दूरवर असलेला हा तालुका डोंगर-दऱ्यांमधून वसलेला आहे. शैक्षणिक सोयीसुविधांचा मोठ्या प्रमाणात अभाव या ठिकाणी दिसून येतो. अशा प्रतीकूल परिस्थितीत शिक्षणाचा वसा घेऊन श्रीमती गीता पाटील व त्यांचे सर्व सहकारी यांनी 2008 पासून या विद्यालयात काम करण्यास सुरुवात केली आहे. सुरुवातीला विद्यालय हे अल्प बचत गट असेल, पंचायत समितीची इमारत असेल जशी सोय होईल अशा ठिकाणी सुरू झाले. पण मुलींच्या शिक्षणाच्या, आरोग्याच्या, भौतिक सोयी-सुविधांचा प्रश्न त्यांच्यासमोर आ वासून उभा होता. स्वतःच्या मालकीची इमारत नसल्याकारणाने अनेकदा पिण्याच्या पाण्यापासून ते स्वच्छतागृहापर्यंत वेगवेगळया अडचणी त्यांना यायच्या. त्यातच गगनबावड्याचा मुसळधार पाऊस, सर्वत्र दाट धुके म्हणजे आणखीन वेगळेच संकट. अशा या प्रतिकूल परिस्थितीमध्ये त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात टिकवून ठेवण्यासाठी नानाविध प्रयत्न केले. सुरुवातीला 200८ मध्ये शाळेचा एकूण पट 30 इतकाच होता. तो वाढत जाऊन २०० च्या घरात पोहोचला आहे. इयत्ता आठवीनंतर मात्र मुलींचे पुढील शिक्षण कसं पूर्ण होणार ही चिंता सुरुवातीला लागून राहिली होती आणि 2013-14 पासून नववी व दहावी या वर्गांनासुद्धा मंजुरी मिळाली. पुढे २०१६-१७ पासून उच्च माध्यमिक शिक्षणापर्यंत या संस्थेने मजल मारली. याचं श्रेय केवळ श्रीमती गीता पाटील व त्यांचे सर्व सहकारी यांना जाते.

यशाचा हा प्रवास म्हणावा तितका सोपा नव्हता. विद्यालयातील सर्व कर्मचारी हे तसे पाहता कंत्राटी स्वरूपात नियुक्त आहेत. मिळणारे मानधन हे इतरांपेक्षा तुलनेने कमी आहे. पण तरीसुद्धा या सर्व टीमने माघार न घेता आहे त्या परिस्थितीत पुढे जाण्याचा निश्चय केला आहे. सुरुवातीला वस्ती-वाड्यांमध्ये जाऊन विद्यालयांमध्ये मुलींना प्रवेश घेण्यासाठी समाज व पालकांमध्ये जाणीव जागृती निर्माण केली. मुलींना शिक्षण देणे महत्त्वाचे आहे, यासाठी घरोघरी जाऊन गृहभेटी घेऊन, लोकांच्या मनामध्ये मतपरिवर्तन केले. त्यातून काही पालकांनी विद्यालयातील शिक्षकांना प्रतिसाद दिला. विद्यालयात येणाऱ्या मुली या विविध भागातून, विविध शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक पार्श्वभूमी असलेल्या गटातून येत होत्या. शैक्षणिकदृष्ट्या मुली अप्रगत होत्या. यात जमेची बाजू म्हणजे मुलींमध्ये शिकण्याची इच्छा व जिद्द होती. शिक्षकांनी या सर्वांचे भांडवल न करता प्रत्येक मुलीप्रमाणे 'रिपोर्ट कार्ड' तयार करून तिला गुणवत्तेत अग्रेसर ठेवण्यासाठी 'मास्टर प्लान' तयार केला. प्रत्येक मुलीची शैक्षणिक प्रगती कशी साधता येईल यासाठी मार्गक्रमण सुरु केले. ग्रामीण भागातल्या मुलींकडे वेगवेगळी अंगभूत गुणवैशिष्ट्ये असतात, ती हेरून त्यांना पुढे जाण्यासाठी वेगवेगळे अभ्यासेतर उपक्रमांचे आयोजन केले. त्यामध्ये संग्रह वृत्तीतून विज्ञान विषयाचे शिक्षण, क्षेत्रभेट, नाट्यीकरणातून शिक्षण, खेळ व प्रश्नोत्तरेद्वारे अभ्यास, गणिती खेळ, भाषिक खेळ, दैनंदिन जीवनातील उदाहरणांच्या आधारे शिक्षण, वर्गामध्ये मैत्रीपूर्ण वातावरण, संवाद कौशल्य, सोपी भाषा, बोलक्या भिंती, विज्ञान कोडी, विद्यालयात विविध माहितीचे फलक, चित्रकला, संगीत, सांस्कृतिक कार्यक्रम, माती काम, कागद काम, सामाजिक व आरोग्यविषयक चर्चा, कथाकथन, रचनात्मक लेखन यासोबतच विविध प्रकारचे व्यायाम व खेळ या माध्यमातून मुलींचा सर्वांगीण विकास कसा साध्य होईल यासाठी सातत्याने प्रयत्न केला गेला.

विद्यालयातील मुलींच्या आरोग्याकडेसुद्धा तितकेच कटाक्षाने लक्ष दिले जाते. प्रत्येक मुलीची स्वतंत्र वैद्यकीय तपासणी, आजारी पडल्यानंतर तात्काळ वैद्यकीय उपचार, प्रत्येक विद्यार्थिनीचे स्वास्थ्य कार्ड, मुलींचे आरोग्य तंदुरुस्त राहण्यासाठी आहारामध्ये विविध जीवनसत्वयुक्त व प्रोटीनयुक्त आहार याचे नियोजन केले जाते. दररोज दुपारच्या जेवणात सलाड किंवा कोशिंबीर, स्थानिक उपलब्धतेनुसार पालेभाजी, फळ भाजी,

आठवड्यातून एकदा व सणाच्या दिवशी विद्यार्थ्यांना मिष्ठान्न भोजन, महिन्यातून दोनदा मांसाहार, ज्या विद्यार्थिनीं मांसाहार घेणार नाहीत त्यांना गोड पदार्थ अशा प्रकारे सर्वांना आहार दिला जात आहे.

विद्यालयातील विद्यार्थिनींना व्यावसायिक व विशेष प्रशिक्षण दिले जाते. यामध्ये संगणक संबंधित सर्व कोर्सेस, स्पोकन इंग्लिश, कराटे प्रशिक्षण, ब्युटी पार्लर, टेलरींग व ड्रेस मेकींग, घरगुती विद्युत उपकरणांची दुरुस्ती, फोटो फ्रेम मेकींग, फॅन्सी बॅग-पर्स बनवणे, स्क्रीन पेन्टिंग, फोटोग्राफी, व्हिडिओ शूटिंग, अन्न टिकवण्याच्या पद्धती, मेणबत्ती-अगरबत्ती बनविणे, सेंद्रिय गांडूळ खत तयार करणे, रोप वाटिका तयार करणे, खेळणी तयार करणे इत्यादी व्यवसाय प्रशिक्षण दिली जातात.




**कस्तुरबा गांधी विद्यालयातील मुलींनी काढलेली चित्रे**

हे सर्व करत असताना विद्यालयातील दैनंदिन कामकाज व इतर सर्व बाबी या शासनाकडून मिळणाऱ्या अनुदानावरती चालत आहेत. काही कारणास्तव अनुदान पुढे पाठीमागे होते, अशा वेळेला मुख्याध्यापिका श्रीमती गीता पाटील या स्वत:च्या जबाबदारीवरती संबंधित पुरवठा धारकांना विनंती करून विद्यालयाचे काम सुरळीत राहील, यासाठी प्रयत्न करत आहेत. यात अनेकदा त्यांना स्वत:ला आर्थिक भारही उचलावा लागत असला तरी या माध्यमातून सर्वसामान्य मुलींच्या शिक्षणासाठी सेवा करण्याची संधी मिळते, या भावनेतून सेवाभावी वृत्तीने मॅडम व त्यांचे सर्व सहकारी कार्य करीत आहेत. विद्यालयाच्या पटनोंदणीचा आलेख हा आपल्याला या सर्वांच्या प्रयत्नांचा व त्यातून प्राप्त होणाऱ्या गुणवत्तेचा पुरावा देत आहेत. सन 2008 पासून ते 2020 मधील पट नोंदींची आकडेवारी खाली दिली आहे. यात सन २०20 मध्ये कोरोनासदृश्य परिस्थितीमुळे प्रवेश क्षमता कमी झाल्याचे दिसून येते.

**कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय,गगनबावडा - प्रवेश**

| अ.न. | शैक्षणिक वर्ष | मुलींची संख्या | |
|---|---|---|---|
| | | इ.६वी.ते ८वी. | इ.९वी.ते १२वी. |
| १ | सन २००८-२००९ | ३० | - |
| २ | सन २००९ - २०१० | ६५ | - |
| ३ | सन २०१० - २०११ | १०० | - |
| ४ | सन २०११ - २०१२ | १०० | - |
| 5 | सन २०१२ - २०१३ | १०० | - |
| ६ | सन २०१३ - २०१४ | १०० | २९ |
| ७ | सन २०१४ – २०१५ | १०० | ५० |
| ८ | सन २०१५ - २०१६ | १०० | ५० |
| ९ | सन २०१६ - २०१७ | १०० | ६८ |
| १० | सन २०१७ - २०१८ | १०० | ७६ |
| ११ | सन २०१८ - २०१९ | ११४ | ७८ |
| १२ | सन २०१९ - २०२० | १०४ | ८७ |
| १३ | सन २०२० - २०२१ | ७६ | ९८ |

## तक्ता क्र. - ३ शैक्षणिक वर्षनिहाय पट

उपक्रमशिल शिक्षकांच्या सहकार्याने शाळेत विविध उपक्रम सुरु झाले जसे - श्री. प्रकाश कांबळे सन 2010 मध्ये इंग्रजी विषय शिक्षक या पदावर रुजू झाले. त्यांनी अनेक उपक्रम सुरू केले. त्यामध्ये प्रज्ञावान व अप्रगत विद्यार्थिनींसाठी वेगवेगळे वर्ग, ज्यादा तासिका, विषय कोपरे, बालसभा, इंग्रजी कार्यशाळा, शैक्षणिक साधन निर्मिती असे विविध उपक्रम घेतले. यामध्ये विद्यार्थिनींचा उस्फुर्त सहभाग लाभला. मुख्याध्यापकांनी घेतलेल्या निर्णयाला मोलाची साथ सरांनी दिली. ज्यामध्ये जुन्या इमारतीतून नव्या इमारतीत मुलींना स्थलांतरीत करणे. नवीन इमारतीमध्ये संडास-बाथरूम, ड्रेनेज पाईप, विद्युत व्यवस्था, इन्वर्टर, लाईट फिटिंग, गरम पाण्यासाठी बंब, कार्यालयासाठी नवीन टेबले-खुर्च्या, संगणक, प्रिंटर, संरक्षक भिंत, खेळण्यासाठी मैदान, पाणी व्यवस्थेसाठी पाईप लाईन, विहीर स्वच्छता, मोटर बसविणे, पाण्याचा पुरेसा साठा करणे, इत्यादी बरोबरच विद्यार्थिनींना उपलब्ध निधीमध्ये जास्तीत जास्त सोयी देण्याचा प्रयत्न केला. अध्यापन साहित्य, युनिफॉर्म, नाईट ड्रेस, साबण, तेल, ब्रश, पेस्ट, गाद्या, बेड, टॉवेल, स्वेटर, इनरवेअर, शुज, पायमोजे, सँडल इ. साहित्य पुरविले. सहकारी शिक्षकांना योग्य ते मार्गदर्शन व प्रबोधन करून विविध शैक्षणिक उपक्रम घेण्यास प्रवृत्त केले. त्यामध्ये क्षेत्रभेटी, विषय कार्यशाळा, किमान अध्ययन क्षमता पूर्ण करणे, सहली, सांस्कृतिक-सहशालेय स्पर्धा, क्रीडा स्पर्धा, स्नेहसंमेलन, वनभोजन, पालक भेटी व पालक सभा यांचे आयोजन केले. मुलींसमोर आदर्श ठेवण्यासाठी व त्यांच्यातील जिद्दीला योग्य मार्ग मिळवून देण्यासाठी विद्यालयास विविध मान्यवरांच्या भेटी घडवून आणल्या.



मा.शोभा तावडे,शिक्षणतज्ञ,कोल्हापूर मुलींना मार्गदर्शन करताना



मा.खासदार धनंजय महाडीक यांची विद्यालयास सदिच्छा भेट



मा.डॉ.आय.सी शेख,प्राचार्य DIET,कोल्हापूर - मुलींना व्यवसाय करिअर संबंधी मार्गदर्शन करताना



मा. दौलत देसाई, जिल्हाधिकारी,कोल्हापूर यांचेसमोर - जुडो कराटे प्रात्यक्षिक सादर करताना मुली

याबरोबरच इयत्ता दहावीसाठी ज्यादा तासिका व विशेष तज्ञ मार्गदर्शन वर्गांचे आयोजन, विद्यालयातील नवीन व लहान मुली रमण्यासाठी स्वतंत्र टेलिफोन व टीव्ही, जेवणामध्ये दर आठवड्याला अंडी, मटन, गोड पदार्थ, सॅलड, सण उत्सवावेळी विशेष मेनू, संध्याकाळी दूध - बिस्किट, दररोज अभ्यासिका, क्रीडा तासांचे आयोजन केले. पोषक रुचकर आहार, नियमित आरोग्य तपासणी व वेळेवर उपचार, सॅनिटरी नॅपकिन पुरवठा, वैयक्तिक स्वच्छतेबाबत किशोरवयीन मुलींसाठी मार्गदर्शन सत्र, प्रयोगशाळा साहित्य पुरवठा व वापर, ग्रंथालय पुस्तक व वापर, गुणवत्ता शिस्त व सुरक्षेच्या दृष्टीने नियमावली व त्याचे शिक्षक विद्यार्थी पालक स्तरावर पालन, अशा नानाविध मार्गांनी विद्यार्थिनींना विविध स्तरावर स्पर्धेसाठी भाग घेण्याबरोबरच सर्वांगीण विकास होण्यास प्रोत्साहित केले.



विद्यालयात वाचन प्रेरणा दिन साजरा करताना



मा.श्रीम.संगीता पाटील,पोलीस उपनिरीक्षक,गगनबावडा
करिअर संदर्भात मुलींना मार्गदर्शन करताना

श्रीम.अश्विनी खोराटे गणित विषय शिक्षिका यांनी समाजामध्ये वावरत असताना कसे वागले पाहिजे, कसे बोलले पाहिजे या प्राथमिक गोष्टी मुलांना शिकवण्यास सुरुवात केली. प्रत्यक्ष गृहभेटी देऊन पट वाढवण्यासाठी प्रयत्न केला. ज्ञानरचनावाद, गणित जत्रा, गणित कोपरा व गणितीय प्रात्यक्षिक करणे या विविध उपक्रमातून विद्यार्थिनींची गणित विषयातील गुणवत्ता वाढविण्याचा प्रयत्न करत आहेत.




सौ.सविता जयसिंग पडवळ या शाळेत 19 नोव्हेंबर 2008 पासून विज्ञान शिक्षिका म्हणून कार्यरत आहेत. सुरुवातीला मुलींची निवासी शाळा असल्याने पट संख्या खूपच कमी होती. तसेच वेगवेगळया परिस्थितीतून आलेल्या मुलींचे राहणीमान, विचार, संस्कार पूर्ण वेगळे होते. त्यांना वेशभूषा, केशभूषा, आहार, चालणे -बोलणे अशा सर्व गोष्टी त्या मुलींना शिकवू लागल्या. शाळेला आल्यानंतर सुरुवातीला रडणाऱ्या मुली

हळूहळू शाळेत रमू लागल्या. विज्ञान विषयाच्या अनुषंगाने शास्त्रज्ञांचा परिचय, वैज्ञानिक विचारांवर आधारीत गोष्टी, कोडी, प्रयोग अशा वेगवेगळया स्वरूपात विज्ञानविषयी आवड निर्माण होण्यासाठी प्रयत्न केले. काही मुलींना आई, तर काहींना बाबा नव्हते. त्यामुळे त्यांना समजून घेण्यात त्यांना तारेवरची कसरत करावी लागली. तसेच मुली निवासी असल्याने त्यांच्या आरोग्य विषयक समस्या, उपाय या विषयावर देखील त्यांनी मार्गदर्शन केले .




त्यांनी मुलींना विज्ञान प्रदर्शन, विज्ञान जत्रा, विज्ञान अपूर्व मेळावा व प्रश्नमंजुषा अशा वेगवेगळया स्पर्धेत भाग घेण्यास प्रेरणा दिली. मुली आवडीने विविध स्पर्धेत भाग घेऊ लागल्या. अपर्णा कांबळे या विद्यार्थीनीच्या **'वाहतुकीसाठी आधुनिक पद्धत'** या उपकरणाची इन्स्पायर अॅवॉर्ड राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये निवड झाली.

श्री. जनार्दन देशमुख अंशकालीन कला शिक्षक यांनी मुली आपल्या घरापासून दूर असल्याने त्यांचे मन शाळेत रमावे यासाठी विविध कलेचे उपक्रम घेतले. त्यासाठी कागद काम, रंगांची उधळण, मातीकाम अशा विविध प्रकारच्या चित्र निर्मितीतून आनंद घेत मुली या प्रशालेत कशा रममाण होतील हे सुरुवातीला पाहिले. आता त्यांना घरची आठवण येत नव्हती. चित्रकला या विषयाची आवड त्यांच्यामध्ये निर्माण झाली. मुलींनी कला विषयांमध्ये आपले नाव राष्ट्रीय राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय स्पर्धेत उज्वल केले आहे. यामध्ये शुभांगी लक्ष्मण कांबळे, सुप्रिया कांबळे, श्वेता अशा इतर बऱ्याच मुलींची नावे देशमुख सर अभिमानाने घेतात.

श्रीम.फरीदा बोबडे यांनी क्रीडा विषयाच्या माध्यमातून मुलींमध्ये खेळाची आवड निर्माण केली. खेळाला ग्राउंड नसल्याने वर्गामध्येच कॅरम, बुद्धिबळ, बॅडमिंटन, इत्यादी खेळांच्या माध्यमातून मुलींमध्ये खेळाची आवड निर्माण केली. काही दिवसांनी शाळेला इमारत प्राप्त झाली पण खेळासाठी मैदान नव्हते. शाळेच्या पाठीमागे असणारे क्रीडा संकुलावर मुलींना नेऊन तेथे खो-खो, कबड्डी, धावणे, गोळाफेक, थाळीफेक, रिंग, टेनिस आणि व्हॉलिबॉल अशा अनेक खेळांतून मुलींमध्ये खेळाची आवड निर्माण केली. एक वेगळे आनंदाचे वातावरण त्यांच्यामध्ये निर्माण केले. त्यांना वेगवेगळया क्रीडा स्पर्धेत भाग घेण्यासाठी प्रेरणा दिली. मुली शालेय क्रीडा स्पर्धेत भाग घेऊन तालुकास्तरीय, जिल्हास्तरीय व विभाग स्तरांपर्यंत पोहोचू लागल्या आहेत हीच त्यांच्या प्रयत्नांच्या यशाची पोचपावती आहे.





**विद्यालयातील क्रीडा विषयक क्षणचित्रे**

स्नेहा अनिल आवळे ही मुलगी किक बॉक्सिंग स्पर्धेत राज्यपातळीवर पहिली आली आणि तिची राष्ट्रीय पातळीवरसुद्धा निवड झाली. सरिता बबन शेळके 45 किलो वजनी गटातून कुस्ती स्पर्धेत जिल्हा पातळीवर पहिली येऊन तिची विभागस्तरावर निवड झाली. सरिता बबन शेळके या मुलीने थाळीफेक, गोळाफेक स्पर्धेत जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक घेऊन विभागीय स्पर्धेत भाग घेतला. तसेच दिव्या रामचंद्र संकपाळ या मुलीने सलग चार वर्षे धावणे स्पर्धेत जिल्हा परिषद अध्यक्ष चषक स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक पटकाविला आहे. अशा तऱ्हेने वेगवेगळया परिस्थितीतून, तळागाळातून आलेल्या मुलींमध्ये क्रीडा स्पर्धेच्या माध्यमातून खेळाविषयी चांगले वातावरण निर्माण केले आहे. त्याशिवाय मॅडम मराठी विषयाचे अध्यापन करतात. मराठी विषयाचे अध्यापन करीत असताना मुलींना निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धेत भाग घेण्याची प्रेरणा दिली. या प्रेरणेमळेच मुली निबंध व वक्तृत्व स्पर्धेत झळकू लागल्या. महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद कथाकथन स्पर्धेत पल्लवी पांडुरंग बाबर हिने प्रथम क्रमांक तर मराठी मंडळ वाई तर्फे मुंबई येथे आयोजित वक्तृत्व स्पर्धेत सरिता रामचंद्र बावाचे हेने द्वितीय क्रमांक पटकविला. जिल्हास्तरीय हस्ताक्षर स्पर्धेत कु. रोहिणी संजय खादळकर हिने प्रथम क्रमांक मिळविला आहे.

जवळपास एक तप होत आले आहे. श्रीम. गीता पाटील व त्यांचे सहकारी गरजू, होतकरू मुलींसाठी अविरत प्रयत्न करीत आहेत. सध्या त्यांच्या मदतीला श्रीम.सुविद्या चौगुले या इयत्ता ९ वी ते १२ वीचे युनिट सांभाळत आहेत. विद्यालयाचे कामकाज करीत असताना लोकप्रतिनिधी व प्रशासनातील विविध मान्यवरांचे विशेष योगदान नेहमी मिळत असल्याचे मुख्याध्यापिका आवर्जून सांगतात. यामध्ये विद्यालयाच्या स्थापनेपासून ते आजतागायत कार्यरत असलेले जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, प्राचार्य जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, शिक्षणाधिकारी, तहसिलदार, गट विकास अधिकारी, गट शिक्षणाधिकारी, वैद्यकीय अधिकारी, इत्यादींचे वेळोवेळी मार्गदर्शन मिळत असल्याचाही आवर्जून उल्लेख त्यांनी केला.

श्रीम. गीता पाटील व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी मिळून २००८ मध्ये स्थापन झालेल्या या छोट्या रोपट्याचे आज एका वटवृक्षात रुपांतर केले आहे. प्रतिकूल व तत्कालीन परिस्थितीत मुलींच्या शिक्षणासाठी त्यांनी उभे केलेले काम वाटते तितके सोपे नाही. गरजू, वंचित, दुर्बल, दारिद्रय रेषेखालील, एकल पालकत्व व शैक्षणिक दृष्ट्या मागास गटातील मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात टिकवून ठेवणा-या विद्यालयाचे काम आपल्या सर्वांसाठी नक्कीच आदर्शवत ठरणारे आहे.

**चिंतनात्मक प्रश्न -**

1. दुर्गम, डोंगराळ, ग्रामीण व शैक्षणिक दृष्ट्या मागास क्षेत्र भागातील मुलींच्या निवासी शाळेत काम करून गुणवत्तापूर्ण शिक्षण देताना मुख्याध्यापक व शिक्षक यांना कोणत्या आव्हानांना सामोरे जावे लागले.
2. विद्यालयातील मुलींना गुणवत्तेत अग्रेसर ठेवण्यासाठी मुख्याध्यापक व त्यांच्या सहकाऱ्यांनी कोणते प्रयत्न केले.

**चर्चा करुया, विचार करूया -**

1. आपली नियुक्ती ग्रामीण भागातील शाळेत झाली आहे. त्या ठिकाणी मुलींच्या शिकण्याविषयी समाज, पालक यांच्यामध्ये अनास्था आहे. यासंदर्भात जाणीव जागृती निर्माण करण्यासाठी आपण काय कराल.
2. आपण काम करत असलेल्या क्षेत्रामध्ये मुलींचे शाळाबाह्य होण्याचे प्रमाण अधिक आहे अशा वेळी मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात टिकून ठेवण्यासाठी आपली रणनीती तयार करा.
3. ग्रामीण भागात मुलींना वस्तीगृहात शिक्षणासाठी पाठविण्याबाबत प्रचंड अनास्था असते. ही अनास्था दूर करण्यासाठी आपण काय करू शकतो याविषयी आपल्या सहकाऱ्यांमध्ये चर्चा करा.

**मुलींना शिक्षण प्रवाहात टिकवून ठेवण्यासाठी शाळा,मुख्याध्यापक,शिक्षक यांना असेही करता येईल -**

1. आसपासच्या गावात कस्तुरबा गांधी विद्यालयात शिकणाऱ्या मुलींना शैक्षणिक सुविधा, शैक्षणिक संधी याबाबत जनजागृती केली तर प्रवेश वाढण्यास मदत होईल.
2. प्रवेश क्षमतेप्रमाणे सर्व प्रवेश पूर्ण होतील यासाठी ग्रामस्थ शालेय व्यवस्थापन समिती सदस्य, गावातील पदाधिकारी यांची मदत घेऊन मुख्याध्यापक व शिक्षकांनी प्रयत्न करावेत.
3. विद्यालयाच्या माजी विद्यार्थिनींच्या माध्यमातून वर्षातून एक दिवस स्नेह मेळावा भरवावा.यामध्ये स्वत:च्या पायावर उभे राहून उद्योग,व्यवसाय किंवा नोकरी करणाऱ्या विद्यार्थिनींचा आजी विद्यार्थिनींसोबत संवाद साधण्याची संधी उपलब्ध करून द्यावी. जेणेकरून इतर विद्यार्थिनींना त्यातून प्रेरणा मिळेल.
4. शालेय स्तरावर घेण्यात येणाऱ्या विविध स्पर्धा परीक्षेची विद्यार्थिनींकडून तयारी करून घ्यावी.यातून यशस्वी विद्यार्थिनींचा आदर्श इतर विद्यार्थिनींसमोर तसेच समाजासमोर राहून मुलींचा शिक्षणातील ओढा वाढविण्यास मदत होईल.
5. विद्यालयातील सर्वच विद्यार्थिनींना सांघिक व वैयक्तिक खेळामध्ये सहभागी होण्यास प्रेरित करावे.
6. दरवर्षी विद्यालयाचा वार्षिक अहवाल तयार करावा.अहवालामध्ये वर्षभरातील अभ्यासपुरक, अभ्यासेत्तर उपक्रम, वर्षभरातील मूल्यमापनाचा तपशील, विद्यार्थिनींनी विविध स्पर्धेत मिळविलेले यश व विद्यालयातील घडामोडींचा तपशील द्यावा.
7. विद्यालयातील माजी विद्यार्थिनींचे एकत्रित माहितीचे रजिस्टर विद्यालयात प्रवेश घेण्यासाठी येणाऱ्या पालकांना उपलब्ध करून द्यावे. जेणेकरून पालकांमध्ये विद्यालयाविषयी सकारात्मक भावना निर्माण होईल.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने ग्रामीण दुर्गम डोंगराळ व शैक्षणिकदृष्ट्या मागास गटातील मुलींना पुढील शिक्षणाच्या प्रवाहात टिकवून ठेवण्यासंदर्भाने केलेला विचार -**

1. सर्व मुलींना आणि ट्रान्स - जेंडर विद्यार्थ्यांना न्याय्य, गुणवत्तापूर्ण शिक्षण पुरवण्याची देशाची क्षमता तयार करण्यासाठी भारत सरकार ' लिंग - समावेश निधी ' तयार करेल .
2. मुलींना आणि ट्रान्स - जेंडर विद्यार्थ्यांना शिक्षण मिळण्यासाठी मदत करण्यासाठी केंद्र सरकारने महत्त्वाच्या म्हणून निश्चित केलेल्या प्राधान्यांची अंमलबजावणी करण्यासाठी ( उदा . स्वच्छता आणि शौचालयांची सुविधा , सायकली , रोख रक्कम हस्तांतरण इ. ) राज्यांना हा निधी उपलब्ध असेल .
3. मुलींना आणि ट्रान्स - जेंडर विद्यार्थ्यांना शिक्षणाला प्रवेश मिळण्यासाठी आणि शिक्षणात सहभागी होण्यासाठी स्थानिक संदर्भातील विशिष्ट अडथळे दूर करण्यासाठी समुदाय आधारित हस्तक्षेपांना पाठिंबा देण्यासाठी आणि त्यांचे प्रमाण वाढवण्यासाठीसुद्धा हा निधी राज्यांना सक्षम करेल .
4. याच प्रकारच्या समावेश निधी योजना इतर सोशिओ इकॉनॉमिकॅल डीसआडवान्टेज ग्रुप मधील प्रवेशाच्या समस्यांवर उपाययोजना म्हणून विकसित करण्यात येतील.
5. कोणत्याही लिंगाच्या किंवा इतर सामाजिक - आर्थिकदृष्ट्या वंचित गटातील मुलांना शिक्षण (व्यावसायिक शिक्षणासह) उपलब्ध होण्यामध्ये शिल्लक असलेली असमानता दूर करण्याचे या धोरणाचे ध्येय आहे .
6. ज्या शाळांच्या ठिकाणी मुलांना फार दुरून यावे लागते त्यांच्यासाठी आणि विशेषतः सामाजिक - आर्थिकदृष्ट्या वंचित पार्श्वभूमीमधून आलेल्या मुलांसाठी जवाहर नवोदय विद्यालयांच्या दर्जाच्या, सर्व विद्यार्थ्यांच्या विशेषतः मुलींच्या सुरक्षिततेची योग्य व्यवस्था असलेल्या मोफत वसतिगृह सुविधा उभ्या केल्या जातील.
7. कस्तुरबा गांधी बालिका विद्यालये सक्षम केली जातील आणि चांगल्या दर्जाच्या शाळांमधील ( इयत्ता 12 वी पर्यंत) सामाजिक - आर्थिकदृष्ट्या वंचित पार्श्वभूमीमधून आलेल्या मुलींचा सहभाग वाढवण्यासाठी या विद्यालयांचा विस्तार केला जाईल.
8. उच्च दर्जाच्या शैक्षणिक संधी वाढवण्यासाठी देशभर विशेषतः महत्त्वाकांक्षी जिल्ह्यांमध्ये खास शैक्षणिक विभागांमध्ये आणि इतर वंचित भागांमध्ये अतिरिक्त जवाहर नवोदय विद्यालये आणि केंद्रिय विद्यालये बांधली जातील .

**मोड्यूलची उपयुक्तता -**

मुलींच्या शिक्षणाची प्राथमिकता लक्षात घेऊन केंद्र शासनाने "प्राथमिक स्तरावरील मुलींच्या शिक्षणासाठी राष्ट्रीय कार्यक्रम" (NPEGEL) या नावाने अत्यंत मूलगामी परिणाम घडवून आणण्यास सक्षम असणारा कार्यक्रम सुरू केला आहे. सदर कार्यक्रमांतर्गत प्राथमिक शिक्षणापासून पूर्णपणे वंचित राहिलेल्या तसेच शाळा अर्धवट सोडून निरक्षरतेच्या दिशेने वाटचाल करणाऱ्या मुलींकरता त्यांचे किमान इयत्ता आठवीपर्यंत शिक्षण पूर्ण करणे व त्याचे उच्चीकरण करुन इयत्ता बारावीपर्यंत मुलींचे शिक्षण पूर्ण करण्यासाठी कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय योजना सुरू करण्यात आली आहे. शासन शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करण्यासाठी वेगवेगळे प्रयत्न करत असते पण त्या प्रयत्नांना यश मिळणार की नाही हे त्याची अंमलबजावणी करणाऱ्या घटकांवरती अवलंबून असते. गगनबावडा तालुक्यातील कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय हे या योजनेचे एक यशस्वी प्रारूप आहे. विद्यालय ज्या परिक्षेत्रात वसलेले आहे तो भाग ग्रामीण, दुर्गम, डोंगरी, दुर्बल, वंचित व शैक्षणिकदृष्ट्या मागास क्षेत्रांमध्ये येतो. अशा ठिकाणी मुख्याध्यापकांनी उपरोक्त सर्व

बाबींवरती मात करून प्रशासनाच्या सकारात्मक सहकार्याने मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात टिकवून ठेवण्यासाठी वेगवेगळ्या माध्यमातून प्रयत्न केले आहेत. ग्रामीण भागामध्ये शिक्षणाविषयी जाणीव-जागृती पासून शिक्षणातील मुलींची प्राथमिकता, मुलींचे आरोग्य, मुलींना व्यवसाय शिक्षण व व्यक्तिमत्व विकास या विविध माध्यमातून मुलींना स्वयंपूर्ण करण्याचा प्रयत्न मुख्याध्यापक व त्यांचे सर्व सहकारी (शिक्षक, अंशकालीन शिक्षक, लेखापाल, मुख्य व सहायक स्वयंपाकी, चौकीदार व शिपाई) करीत आहेत. प्रत्येकाला आपापल्या शालेय पार्श्वभूमीनुसार येणाऱ्या समस्यांवर व आव्हानांवर मात करून गुणवत्ता प्राप्त करण्यासाठी हे मोड्यूल निश्चितच प्रेरणादायी व दिशादर्शक ठरेल.

**समारोप -**

शासन समाजातील विषमता दूर होऊन सर्वत्र समानता प्रस्थापित व्हावी म्हणून नेहमी सकारात्मक असते. विविध योजनांच्या माध्यमातून असमानतेची दरी कमी होऊन संविधानातील न्याय,समता,बंधुता ही मुल्ये रुजविण्यासाठी नेहमी प्रयत्नशील असते. सामाजिक न्याय आणि समानता साध्य करण्यासाठीचे एकमेव सर्वोत्तम साधन म्हणजे शिक्षण होय.कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय ही योजना मुलींच्या शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाच्या उद्देशानेच आणली गेली.कोणत्याही योजनेचे यश - अपयश हे योजना प्रत्यक्ष अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणेवर अवलंबून असते.आजूबाजूला सर्वच दृष्टीने परिस्थिती जर प्रतिकूल असेल तर ते आणखी आव्हानात्मक ठरते.अशा संपूर्ण पार्श्वभूमीवर आपल्या कार्यातून अजोड ठसा उमटविणाऱ्या कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय,गगनबावडा येथील मुख्याध्यापिका श्रीम.गीता पाटील व त्यांचे सर्व सहकारी आणि त्यांना मदत व मार्गदर्शन करणारे सर्व लोकप्रतिनिधी व प्रशासनातील जाणकार अधिकारी तसेच आपल्या सर्वांसाठी एक उत्तम उदाहरण आहे.

**संदर्भ -**


1. निष्ठा शिक्षक प्रशिक्षण संच राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे
2. कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय सर्वसाधारण प्रकारच्या मार्गदर्शक सूचना 2020-21 महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद महाराष्ट्र
3. कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय मार्गदर्शक सूचना महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई
4. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020
5. राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा 2005


**महत्वाचे शासन निर्णय -**

1. शासन निर्णय क्रमांक, एसएसए - 2008/प्र.क्र. 316/प्राशि - 4 मंत्रालय, मुंबई 400032 दि. 27 मे 2008
2. शासन निर्णय,नियोजन विभाग क्रमांक डोविका -२००९/प्र.क्र.६/का.१४८३ मंत्रालय मुंबई दि १८ जानेवारी २०१०
3. शासन निर्णय, नियोजन विभाग क्रमांक डोविका -२०१५/प्र.क्र.४२/का.१४८१-अ मंत्रालय मुंबई दि १५ जून २०१८

Website

https://mdd.maharashtra.gov.in/

https://samagra.education.gov.in/index.html

https://www.censusindia.co.in/subdistrict/bavda-taluka-kolhapur-maharashtra-४२८८

You Tube Link - KGBV, Gaganbavada.

https://youtu.be/ljpbrcklsgU

https://youtu.be/०५४jm१२९८H४

https://youtu.be/VGkVw९Lr७PQ

| **मोड्यूल विकसक** | **समन्वयन** | **मार्गदर्शक** |
|---|---|---|
| श्री.रमेश बापू कोरे | डॉ.ज्योती कुलकर्णी | श्री.रमाकांत काठमोरे |
| अधिव्याख्याता | समन्वयक | संचालक |
| जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, कोल्हापूर. | महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा), औरंगाबाद | महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा),औरंगाबाद |